N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर    **P.S.(ठाणे):** अहमदनगर कॅम्प

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0415    **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/04/2024 05:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार    **Date From (दिनांक पासून):** 18/04/2024

**Time Period (कालावधी):**    **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/04/2024

**Time From (वेळेपासून):** 13:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/04/2024    **Time (वेळ):** 03:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/04/2024 03:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 4 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पाटबंधारे संशोधन व जलनिःसारण उ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

9. Parti

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अजय अरूणराव लखापती

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मांगल्य आनंद पार्क, शिंदे मळा,नगर कल्याण रोड, अहमदनगर,अहमदनगर कॅम्प,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मांगल्य आनंद पार्क, शिंदे मळा,नगर कल्याण रोड, अहमदनगर,अहमदनगर कॅम्प,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रुबीया मोहंमद हनिफ शेख | | | 1. पाटबंधारे संशोधन व जलनिःसारण उ,उपविभाग, अहमदनगर,अहमदनगर कॅम्प, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्रीमती रजनी श्रीराम पाटील | | | 1. कार्यकारी अभियंता,वर्ग-1 पाट, बंधारे संशोधन विभाग, नाशिक, अहमदनगर कॅम्प,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 62,000/रुपये लाच रक्कम स्वीकारली | 62,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

62,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 19/04/2024

मी, अजय अरूणराव लखापती, वय 45 वर्ष , धंदा-नोकरी, कनिष्ट अभियंता, पाटबंधारे संशोधन व जलनिःसारण उपविभाग, अहमदनगर, रा. मांगल्य आनंद पार्क, शिंदे मळा, नगर कल्याण रोड, अहमदनगर, मो.नं. 9689871701.

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. असुन मी दि. 18/04/2024 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.लोखंडे यांना फोन करुन एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली होती, त्यानुसार त्यांनी मला दि. 18/04/2024 रोजी 12/00 वा चे सुमारास अहमदनगर येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 12/00 वा. सुमारास मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे हे शासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे स्टॅाफ व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यावेळी श्री. लोखंडे यांनी मला पंचासमक्ष माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, मी सन 2023 पासुन कनिष्ठ अभियंता या पदावर पाटबंधारे संषोधन व जलनिःसारण उपविभाग, अहमदनगर या पदावर कार्यरत आहे. सदयस्थितीत सन 2023-2024 या काळात माझ्याकडे राहुरी तालुका व नेवासा तालुक्यातील चरांची दुरूस्तीची कामे देण्यात आलेली आहेत. राहुरी तालुक्यातील उंबरे गावातील मुळा उजव्या कालव्यावरील उंबरे-2 चर योजनेचे विषेश देखभाल दुरूस्ती करणे सन 2022-2023 हे काम पुर्ण करण्यात आले होते. सदर कामाची देयक रक्कम 7,75,963/-रुपये होती. सदर कामाचे व त्याबरोबर इतर कामांचे देयके अदा करणेकरीता दि. 18/03/2024 रोजी मा.कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक यांना सादर करण्यात आली होती. सदर कामाचे देयक हे संबंधितांना अदा करण्यात आले आहे. त्यानंतर दि. 02/04/2024 रोजीपासुन मा. सहाय्यक अभियंता, श्रेणी-1 श्रीमती रूबिया मोहम्मद हनिफ शेख या माझेकडे वेळोवेळी सदर देयकाचे 8 टक्के प्रमाणे रक्कम स्वतः करीता व 10 टक्कयाप्रमाणे रक्कम मा. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक श्रीमती रजनी पाटील यांचेकरीता मागणी करत आहेत. सदरची रक्कम देण्याकरीता माझेवर श्रीमती शेख मॅडम या दबाव टाकत आहेत. तसेच त्यांनी सदरची रक्कम मी त्यांना दिली नाही तर त्याचे परिणाम भोगावे लागतील, नोकरीचे नुकसान करील असे म्हणुन मला धमकी दिली आहे. मला श्रीमती शेख मॅडम यांना व श्रीमती पाटील मॅडम यांना लाच देण्याची ईच्छा नाही. अषी तक्रार सांगीतली असता सदर तक्रार मला श्री. लोखंडे यांनी माझे स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगीतली असता मी ती लिहुन दिली त्यावर मी, पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे साहेबांनी व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर मी लोकसेवक श्रीमती रुबीया शेख यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॅार्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॅार्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे, दोन्ही पंच व मी निवेदन केले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यावेळी मी श्री.लोखंडे यांना कळविले की, मला व पंचांना एका गाडीवर डबलशिट पाहिले तर शंका निर्माण होवू शकते त्यामुळे आम्हाला स्वतंत्र वाहनाने पाठवा असे सांगितले. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तो माझे ताब्यात दिला. पोलीस उप अधीक्षक श्री.लोखंडे यांनी मला माझेकडील मोटार सायकलने व पंच नं 1 यांना त्यांचेकडील मोटार सायकलने सव्वा एक वाजेचे सुमारास रवाना केले.

त्यानंतर मी व पंच नं. 1 असे पाटबंधारे संशोधन व जलनिःसारण उपविभाग, अहमदनगर, येथे गेलो, तेथुन आलोसे श्रीमती शेख यांच्या कक्षात गेलो. मॅडमला पंचाची शंका येवु नये म्हणुन पंच हे शेतकरी आहे असे सांगीतले व त्यांचा एक चराचा नकाशा मिळणे बाबतचा अर्ज मॅडमकडे दिला, त्यानंतर शेख मॅडम यांनी पंचाला कक्षामध्ये बोलविले व त्यांना त्यांचे चराच्या अर्जाबाबत माहिती विचारली,त्यानंतर पंच दरवाज्याजवळ जावुन उभे राहिले, त्यानंतर शेख मॅडम यांचेशी इतर कामाची चर्चा झाली. त्यानंतर त्यांनी माझ्याशी माझ्या उंबरे-2 गावाच्या कामाबाबत चर्चा केली, त्या चर्चे दरम्यान त्यांनी संबंधीत ठेकेदारला अदा केलेले बील रक्कम 7,75,963/- रुपयाचे 08 टक्के स्वतःसाठी व 10 टक्के रक्कम कार्यकारी अभियंता श्रीमती रजनी पाटील यांचे करीता माझ्याकडे मागणी केली, त्यावेळी मी त्यांना म्हणालो, मी सध्या तुमच्याकडे 62,000/- रुपये देतो, त्यावर त्यांनी होकार दिला,त्यावेळी मी त्यांना म्हणालो, ठिक आहे, मी जेवण करुण येतो. असे म्हणुन मी व पंच असे दुचाकी वाहनांवर सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आलो.त्यावेळी पोकॉ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 अशांनी वरील प्रमाणे हकिकत पोउपअधी श्री. लोखंडे यांना सांगितली. त्यानंतर श्री. लोखंडे यांनी पंचा समक्ष व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले असता, लाचमागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक श्रीमती रुबीया शेख यांनी माझ्याकडे उंबरे-2 चराच्या कामाबाबत संबंधीत ठेकेदारला अदा केलेले बील रक्कम 7,75,963/- रुपयाचे 08 टक्के स्वतःसाठी व 10 टक्के रक्कम कार्यकारी अभियंता श्रीमती रजनी पाटील यांचे करीता माझ्याकडे मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पाटबंधारे संशोधन व जलनिःसारण उपविभाग, अहमदनगर, येथे श्रीमती रुबीया शेख यांचे विरुध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. दरम्यान सापळा पथकात नव्याने हजर झालेले पोलीस निरीक्षक शरद गोर्डे व दोन महिला कर्मचारी यांची श्री. लोखंडे यांनी माझेशी ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझ्या बचतीतुन 62,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 124 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. त्यावेळी पोउपअधी.श्री. लोखंडे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली. त्यानंतर पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी

सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवश्यक रेकॉर्डमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिला व पंच क्र. 1 सह मला माझे दुचाकी वाहनाने श्रीमती रुबीया शेख यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्यासाठी पाटबंधारे संशोधन व जलनिःसारण उपविभाग, अहमदनगर, येथे दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास रवाना केले. पाटबंधारे संशोधन व जलनिःसारण उपविभाग, अहमदनगर, येथे जात असतांना कार्यालयाच्या रस्त्यावर आमच्या कार्यालयाचे कनिश्ठ लिपीक श्री.वेताळ हे भेटले, त्यांना मी मॅडम ऑफीसमध्ये आहे का असे विचारले असता त्यांनी मॅडम बाहेर गेल्या असे सांगीतले, त्यावेळी मी कॅंटिन जवळ आलो, तेथे मला मॅडम बसलेल्या दिसल्या, त्यावेळी मी त्यांना त्या ऑफीसला येणार आहे का असे विचारले असता, त्या म्हणाल्या, तुम्ही ऑफीसकडे चला मी येते, त्यांनतर मी व पंच असे ऑफीसकडे गेलो,त्यानंतर सापळा पथक आमचे मागोमाग त्या ठिकाणी येवुन सापळा लावुन थांबले.त्यानंतर थोडयाच वेळात शेख मॅडम ऑफीसमध्ये येवुन त्यांचे कक्षात बसल्या.

त्यानंतर मी पंचांनी केलेल्या अर्जावरुन त्यांचा नकाशा व पत्र तयार करुन पंचासह मॅडमकडे गेलो. त्यावर मॅडमची सही घेतली, त्यावेळी पंच दरवाज्यामध्ये उभे होते, त्यानंतर शेख मॅडमला म्हणालो, आपण मागणी केलेले पैसे मी आणले आहे, त्यावर शेख मॅडम म्हणाल्या,ठिक आहे, दया, त्यावेळी मी माझ्या पॅटेच्या खिष्यातील अॅथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम बाहेर काढुन शेख मॅडम समोर धरली त्यावेळी त्यांनी ती हाताने स्वीकारली व त्यांनी शिपायाकडुन मागवुन घेतलेल्या बॅगमध्ये सदर लाच रक्कम ठेवली, त्यानंतर मी बाहेर येवुन सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला व मी शेख मॅडमच्या कक्षात पंच यांना देण्याचा नकाशा अधोरेखीत करत होतो,त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे व सापळा पथक व पंच क्र.2 असे आले, पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर माझ्या ताब्यातुन घेवुन बंद केले, श्री. लोखंडे साहेबांनी मला लाच रक्कम कोणी स्वीकारली असे

विचारले असता मी खुर्चीवर बसलेल्या महिला हया श्रीमती रुबीया शेख आहेत,त्यांनी लाच रक्कम स्वीकारुन बॅगमध्ये ठेवल्याचे सांगीतले, त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी पंच क्र. 2 च्या मदतीने सदर लाच रक्कम ताब्यात घेतली व सोबतच्या महिला कर्मचारी यांच्या मदतीने रुबीया षेख यांना ताब्यात घेतले. त्यानंतर सापळपुर्व पंचनाम्याच्यावेळी लिहुन घेतलेल्या लाचेच्या नोटांचे नंबर व श्रीमती शेख यांचेकडुन ताब्यात घेतलेल्या नोटांच्या नंबर पाहणी केली असता, ते नंबर एकच असल्याची खात्री झाली. त्यानंतर श्री. लोखंडे यांनी शेख मॅडमला त्यांचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव रुबीया मोहंमद हनिफ शेख, वय-35 वर्ष, व्यवसाय-नोकरी, पद-सहायक अभियंता श्रेणी-1 ,नेमणुक- पाटबंधारे संशोधन व जलनिःसारण उपविभाग, अहमदनगर, असे सांगीतले.

त्यावेळी त्या आरडा ओरड करु लागल्या, मी पैसे घेतले नाही, माझा काही एक संबंध नाही, कार्यकारी अभियंता पाटील यांचा विषय आहे, त्यावेळी त्यांनी मी पाटील मॅडमला फोन लावते असे म्हणाल्या व फोन लावुन पाटील मॅडम काय बोलतात ते तुम्ही ऐका, मग तुमच्या लक्षात येईल, त्यावेळी पो.उप.अधी.श्री.लोखंडे यांनी त्यांना शांत राहणेबाबत व तपासात सहकार्य करण्याबाबत सांगितले. त्यानंतर श्रीमती शेख यांनी श्रीमती पाटील यांना फोन लावला व आंम्हाला ऐकविण्यासाठी त्यांच्या फोनचा स्पीकर ऑन केला, त्यावेळी शेख मॅडम म्हणाल्या, पाटील मॅडम लखापती यांनी उंब-याचे दहा टक्के पैसे माझ्याकडे दिले, त्यावर श्रीमती रजनी पाटील म्हणाल्या, दिलेत का? फक्त उंबरे? त्यावर शेख मॅडम म्हणाल्या, बाकीचे देताय म्हणताय ते, त्यावर पाटील मॅडम म्हणाल्या, ठिक हे, ठिक हे, ओके, चोवीसलाच या, तेवढयासाठी येवु नका कोणी, असे म्हणुन फोन ठेवुन दिला, त्यावेळी सदरचे संभाशण पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकार्डरमध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर निमसे यांनी रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर शेख मॅडम म्हणाल्या, ऐकले का? त्यांचे कामाचे हे पैसे आहे, माझ्या कामाचे नाही, असे बोलत होत्या.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी मला कक्षाचे बाहेर उभे राहण्यास सांगीतले, सदर कक्षामध्ये रुबीया शेख मॅडमच्या हाताच्या व लाच रकमेच्या तपासण्या केल्या,त्यानंतर महिला कर्मचा-यांच्या मदतीने शेख मॅडमला लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहमदनगर येथे घेवुन आले, मला देखील तेथे येण्याबाबत सुचना दिल्या त्यानुसार मी येवुन थांबलो. सदर ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे व सापळा पथकाने पुढील पंचनाम्याचे कामकाज केले.

तरी दिनांक 18/04/2024 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी सव्वा एक ते सव्वा दोन वाजेच्या दरम्यान व सापळा कारवाई वेळी साडे चार ते साडे पाच वाजेच्या दरम्यान यातील लोकसेविका श्रीमती रुबीया शेख,यांनी माझ्याकडे उंबरे-2 चराचे विषेश देखभाल दुरुस्ती कामाचे ठेकेदारला अदा केलेले बील रक्कम 7,75,963/- रुपयाचे 08 टक्के स्वतःसाठी व 10 टक्के रक्कम कार्यकारी अभियंता श्रीमती रजनी पाटील यांचे करीता असे एकुण 18 टक्के लाचेची मागणी केली व दिनांक 18/04/2024 रोजी सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष माझ्याकडुन 18 टक्क्याचा पहिला हप्ता म्हणुन 62,000/-रुपये लाच रक्कम स्वीकारली. तसेच श्रीमती शेख यांनी कार्यकारी अभियंता श्रीमती रजनी पाटील यांना फोन करुन सांगीतले की, लखापती यांनी उंबरे -2 चराचे 10 टक्के पैसे माझ्याकडे दिले असे सांगीतले असता त्यांनी त्यास दुजोरा देवुन सहमती दर्षविली त्यामुळे माझी 1) रुबीया मोहंमद हनिफ शेख, वय-35 वर्ष , व्यवसाय-नोकरी, पद-सहायक अभियंता वर्ग-1 ,नेमणुक- पाटबंधारे संशोधन व जलनिःसारण उपविभाग, अहमदनगर, 2) श्रीमती रजनी श्रीराम पाटील,वय-47 वर्ष, व्यवसाय-नोकरी, पद-कार्यकारी अभियंता,वर्ग-1 पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

yogesh jagannath rajguru(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम** खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** yogesh jagannath ra
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**